# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (राष्ट्रीय सेवा योजना)

डॉ. श्याम खंडारे
संचालक
मो. क्र. ७०२०४८२४४३

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५
web: www.unigug.org
Email: nssdsw.gug@gmail.com

जा.क्र. गो.वि./रासेयो/ २२२/२०२४ दि. १२ / ०६ /२०२४

प्रति,

मा. प्राचार्य/रासेयो कार्यक्रम अधिकारी,
संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीट, गडचिरोली

**विषय - रासेयो जिल्हा समन्वयक व विभागीय समन्वयक करीता प्रस्ताव सादर करण्याबावत.**

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली करीता विभागीय समन्वयक व जिल्हा समन्वयकाची निवड करावयाची असल्याने खालील पात्रता पुर्ण करणाऱ्या इच्छुक रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांनी आपले प्रस्ताव राष्ट्रीय सेवा योजना विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्याकडे दिनांक २४/०६/२०२४ पर्यंत सादर करावे.

**विभागीय समन्वयक पात्रता :-**

१. महाविद्यालयांमध्ये २ ते ३ वर्ष कार्यक्रम अधिकारी म्हणुन कार्य करण्याचा अनुभव.
२. किमान दोन विशेष शिबिराचे आयोजन आणि विद्यापीठ/ राज्यस्तरीय आयोजनात सहभाग.
३. १० दिवसाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी उद्भोदन पुर्ण केले असल्याचे प्रमाणपत्र.
४. विद्यापीट रासेयो कक्षाकडे पुर्ण वर्षाचे अभिलेख व अंकेक्षण विवरण जमा केल्याचे प्रमाणपत्र.
५. किमान ५ ते ८ महाविद्यालयामध्यें समन्वयक प्रस्तावीत करण्याची क्षमता व संवाद कौशल्य.
६. जिल्हा, विद्यापीट राज्य व राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात सहभाग किंवा रासेयो सहभाग किंवा रासेयो पुरस्कार प्राप्त अधिकाऱ्यांना प्राधान्य.

**जिल्हा समन्वयक पात्रता :-**

१. कमीत कमी ३ वर्ष रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणून कार्य करण्याचा अनुभव.
२. किमान तिन विशेष शिबीराचे आयोजन आणि विद्यापीठ/ राज्यस्तरीय आयोजनात सहभाग.
३. कार्यक्रम अधिकारी उद्भोदन/ उजळणी अभ्यासक्रम पुर्ण केले असल्याचे प्रमाणपत्र.
४. जिल्हयातील महाविद्यालयांमध्ये समन्वयक प्रस्तावीत करण्याची क्षमता व संवाद कौशल्य.
५. जिल्हा समन्वयकचा कालावधी तीन वर्ष राहील.
६. जिल्हा, विद्यापीट राज्य व राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात सहभाग किंवा रासेयो सहभाग किंवा रासेयो पुरस्कार प्राप्त अधिकाऱ्यांना प्राधान्य.

(डॉ. श्याम खंडारे)
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

Scanned with OKEN Scanner